## प्रेसनोट

जा.क्र. १००/१८ माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २१/०२/२०१८

### ''जुन्या वादाच्या रागातुन खुन करणाऱ्या आरोपीस आजिवन कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

जुन्या वादाचे रागातुन ग्रम वलणी ता. पवनी येथे १८ वर्षीय महाविद्यालयीन युवतीचा [illegible] धारधार कोयत्याने दिवसा ढवळया खुन करणाऱ्या आरोपी नामे देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे, वय ३५ वर्ष, रा. वलणी ता. पवनी जिल्हा भंडारा यास आज दिनांक २१.०२.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन भंसाली सा. यांनी आरोपी विरूध्द दोषसिध्द झाल्याने खुनाचे गुन्हयात आजिवन कारावासाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २०.०२.२०१५ रोजी पोलीस ठाणे पवनी येथे ग्राम वलणी येथिल महात्मा गांधी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष विलास बुधाजी तिघरे, वय ३५ वर्ष यांनी तक्रार दिली की, गावात राहणारे रामदास यंकाजी जांभुळकर यांचे वलणी गावात कापड विक्रीचे दुकाण होते सदर दुकाण ते त्यांची पत्नी सौ. तुळसाबाई व मुलगी कु. शिल्पा हिचेसह चालवुन उदरनिर्वाह करीत होते. व्यवसायात त्यांनी गावातीलच देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे याला कपडे विकले त्याचे ४८०/– रूपये दिले नाही. वारंवार उधारी मागुनही देवा याने उधारीचे पैसे दिले नाही व त्यांना शिवीगाळ केली. सौ. तुळसाबाई व रामदास जांभुळकर यांनी सदर बाबत तक्रार हे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष असल्याने त्यांना सांगीतले त्यावर तक्रारदार यांनी देवा यास उधारीचे पैसे देण्यास सांगतो असे सांगीतले काही दिवसांनी तक्रारदार देवा यास भेटले असता देवा याने उधारीचे ४८० रूपये परत केले असे सांगीतले त्यानंतर देवा दोन महिण्याकरीता गावाबाहेर गेला होता. देवा ग्राम वलणी येथे परत आल्यानंतर देवा ने सौ. तुळसाबाई व रामदास यांना अधिकचे दिलेले पैसे परत मागीतल्याचे कारणावरून वाद झाला.

दिनांक २०.०२.२०१५ रोजी तक्रारदार यांना सरोज सदाशिव जांभुळकर यांनी फोन करून सांगीतले की, दिनांक १७.०२.२०१५ रोजी देवा यास सौ. तुळसाबाई व ईतर नातेवाईकांनी पैशावरून केलेल्या किरकोळ मारहाण व अपमानाचा राग मणात धरून ग्राम वलणी ते आसगाव रस्त्यावर महेश तिघरे याचे शेता जवळ कु. शिल्पा रामदास जांभुळकर ही तीचे मैत्रिनींसोबत शाळेत आसगाव येथे सकाळी ७.०० वा. दरम्यान जात असता गावातील देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे याने कु. शिल्पा हिस रस्त्यात अळवुन तिचा विनयभंग करून धारधार विळयाने गळयावर, हातावर रामदास जाभुळकर यांचे मुलीचा निर्घुन खुन केला व घटणास्थळावरून पसार झाला अशा माहिती वरून तक्रारदार हे घटणास्थळी जावुन पोलीस स्टेशन पवनी येथे फोन द्वारे माहिती देवुन समक्ष हजर होवुन आरोपी नामे देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे याचे विरूध्द कार्यवाही करीता तोंडी तक्रार दिले वरून पोलीस ठाणे पवनी येथे अपराध क्र. २०/१५ कलम ३०२ भादवि नुसार तत्कालीन पोलीस निरीक्षक राजेंद्र आर. नागरे यांनी गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र आर. नागरे यांनी करून पुढील तपास पोलीस निरीक्षक मधुकर गिते यांना हस्तांतरीत करून गिते यांनी गुन्हयातील **आरोपी नामे देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे, वय ३५ वर्ष** यास अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे प्राप्त झाल्याने गुन्हयात कलम ३५४(ड),३४१,,५०४,५०६(२),१८८ भादवि सह कलम ११(१)(४),१२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक अधिनियम २०१२ या कलमांची वाढ करून आरोपी विरूध्द आरोप पत्र तयार करून विशेष सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. १२/१५ अन्वये न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन भंसाली सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २०.०२.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी देवा उर्फ देवेंद्र ईश्वर गभणे** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि अन्वये आजिवन सश्रम कारावास व १०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावास, कलम ३५४(ड) भादवि अन्वये १ वर्ष, सश्रम कारावास व ५००/– रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा सश्रम कारावास, कलम ३४१ भादवि मध्ये १५ दिवस सश्रम कारावास व ३००/– दंड, कलम ५०४ भादवि मध्ये ६ महिणे कारावास व ३००/– दंड** अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर

गुन्हयात पोलीस निरीक्षक एस. बी. ताजने ठाणेदार पवनी यांचे मार्गदर्शनात पो.हवा. चंद्रशेखर पटले/७७९ पो.स्टे. पवनी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सक्रीय सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.** (कृपया सदर माहिती ही रसमोरच्या पानावर देण्यास विनंती)

२१.२

**(एस.व्ही.कुलकर्णी)**
**पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी क्र.९९८७३८५४०५**

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.